


# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




Qiv
संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३९९ गुरूवार दि २५ जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मविआच्या बैठकीला २३ आमदारांची दांडी; आपण खरंच एकत्र आहोत? उद्धव ठाकरेंकडून समन्वयाबाबत स्पष्ट चिंता व्यक्त



**वृत्तसंस्था-मुंबई**

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच बुधवारी महाविकास आघाडीने आमदारांची विशेष बैठक मुंबईत बोलावली होती. या बैठकीला तिन्ही पक्षांच्या एकूण ६० आमदारांपैकी केवळ ३७ आमदार उपस्थित राहिल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. आघाडीतील समन्वय आणि संघटनात्मक ताकदीबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आल्याचे कळते. मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत शिवसेना (उबाठा) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह संजय राऊत, शशिकांत शिंदे आणि सतेज पाटील उपस्थित होते. पावसाळी अधिवेशनाच्या पाश्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती. विधिमंडळात जनतेचे प्रश्न आक्रमकपणे मांडणे, सभागृहात आणि सभागृहाबाहेर संयुक्त भूमिका घेणे, तसेच सर्व घटक पक्षांमध्ये अधिक समन्वय राखण्यावर भर देण्यात आला. राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला. अलीकडील पक्षांतरांच्या पार्श्वभूमीवर ङ्घजे गेले त्यांचा विचार करू नका, पुढील लढाईवर लक्ष केंद्रित कराफ, असा संदेशही नेतृत्वाने दिल्याचे समजते मात्र, या बैठकीला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. मविआचे सुमारे ६० आमदार आणि विधान परिषद सदस्य उपस्थित राहणे अपेक्षित असताना केवळ ३७ सदस्यांनीच हजेरी लावली. त्यामुळे एकजुटीचा संदेश देण्यासाठी आयोजित बैठकीतच जवळपास निम्मे सदस्य गैरहजर राहिल्याने विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. काँग्रेसचे नाना पटोले, विजय वडेट्टीवार, अमित देशमुख, अस्लम शेख, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील, रोहित पवार, उत्तमराव जानकर, संदीप क्षीरसागर, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सुनील राऊत, गजानन लवटे, बाबाजी काळे हे आमदार अनुपस्थित असल्याची माहिती आहे. महाविकास आघाडीच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी आघाडीतील समन्वयाबाबत स्पष्टपणे चिंता व्यक्त केल्याची माहिती आहे. ङ्घमहाविकास आघाडी म्हणून आपण एकत्र आहोत असे म्हणतो, पण आपण खरंच एकत्र आहोत का ?ङ्घ असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सभागृहात विरोधी पक्ष म्हणून एकत्रित भूमिका मांडली जाते का, एकाच मुद्द्यावर आक्रमकपणे लढले जाते का, याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले. विधिमंडळ अधिवेशनात तसेच सभा, आंदोलने आणि जनसंपर्क कार्यक्रम संयुक्तपणे आयोजित करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले

# राज्यात सध्या कुठेही लोडशेडिंग नाही मुख्यमंत्र्यांचा थेट सभागृहात दावा

**वृत्तसंस्था-मुंबई**

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये वीजेच्या टंचाईमुळे भारनियमन केलं जात असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र राज्यात सध्या कोणतेही भारनियमन केले जात नसल्याचा दावा केला आहे. सध्या वीजेची कोणतीही टंचाई नसून कृषी पंपांना नियमानुसार दिवसा आठ तास वीजपुरवठा केला जात आहे. राज्यातील सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली असून उर्वरित २५ टक्के शेतकऱ्यांनाही यावर्षाअखेरीस दिवसा वीजपुरवठ्याच्या कक्षेत आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत आमदार सदाभाऊ खोत यांनी प्रश्न उपस्थित केला होता, तर आमदार बच्चू कडू, प्रविण दरेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ङ्घमे महिन्यात काही वीज निर्मिती प्रकल्पांमध्ये एकाच वेळी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने अल्पकाळासाठी भारनियमन करावे लागले होते. मात्र सध्या राज्यात कोणतेही भारनियमन करण्यात येत नाही. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या सौर कृषी पंप योजनेंतर्गत विविध भौगोलिक परिस्थितींना अनुरूप मॉडेल विकसित करण्यात आली आहेत. नदीकाठ, पूररेषा, कालवे तसेच खोल जलस्त्रोतांमधून पाणी उपसा करण्यासाठी मोनोपोल, बूस्टर पंप आणि तरंगत्या सौर पंपांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात १० लाखांहून अधिक सौर पंप बसविण्यात आले असून शेतकऱ्यांकडून या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत राज्यात सुमारे २५ हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये फीडर विभक्तीकरण, नवीन उपकेंद्रे, अतिरिक्त रोहित्रे (डीपी) आणि वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. पुढील तीन वर्षांत या कामांमुळे डीपी निकामी होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल,असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर २०३१-३२ पर्यंत ७८ हजार मेगावॅट वीज क्षमता उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या क्षमतेचे प्रभावी वहन सुनिश्चित करण्यासाठी ट्रान्समिशन कॉरिडॉर उभारणीवर विशेष भर देण्यात येत असून टीबीसीबी पद्धतीद्वारे १६ हजार कोटी रुपयांची कामे सुरू झाली आहेत. पुढील तीन वर्षांत ट्रान्समिशन क्षेत्रात



सुमारे ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. दरम्यान, पीएम सूर्य घर योजनेंतर्गत रूफटॉप सौर ऊर्जा निर्मितीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर पोहोचला असून गृहसंकुलांनी मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा स्वीकारल्यास त्यांच्या सामाईक वीज खर्चात मोठी बचत होऊ शकते, असंही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं आहे.

# नियोजनाशी काडीमोड




अर्थसंकल्पात लोकप्रिय योजनांचा पसारा मांडून झाल्यानंतर तीन महिन्यांतच त्यावर पुरवणी मागण्या चे पांघरूण घालण्याच्या क्लृप्त्यांमधील ङ्गसातत्यफ राज्य सरकारने यंदाही कायम ठेवले. वर्षाच्या सुरुवातीला साडेसात लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केल्यावर आता अर्थखात्याने मांडलेल्या तब्बल ९८ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या, हे अर्थसंकल्प अर्थहीन होऊ लागल्याचेच लक्षण म्हणावे लागेल. गेल्या काही वर्षांत या पुरवणी मागण्या आपलेच विक्रम मोडत आहेत. बहुमताच्या जोरावर त्या मान्य होणार, हे स्पष्ट आहे. मात्र, या सगळ्या सव्यापसव्यामध्ये ङ्गनियोजनफ्नामक बाब कोठेही आढळत नाही. त्यामुळेच अर्थखात्याची जबाबदारी सांभाळणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नियोजन खात्याच्या कारभारात गांभीर्याने लक्ष देण्याची वेळ आली आहे. अर्थसंकल्प हे राज्याच्या आर्थिक नियोजनाचे ङ्गबायबलफ मानले जाते; साहजिकच त्यात दाखवलेल्या दिशेनेच जमा-खर्चाची वाटचाल अपेक्षित आहे. मात्र, हल्ली अर्थसंकल्पाचे पावित्र्य हरवून गेले असून, काही महिन्यांतच त्याचे खरे दात पुरवणी मागण्यांच्या रूपाने समोर येत आहेत. खरे तर अनपेक्षित खर्च किंवा आपत्तीसारख्या प्रसंगांमध्ये पुरवणी मागण्या सादर करणे अपेक्षित आहे. परंतु मागण्यांच्या तपशीलात डोकावले, तर अपवाद वगळता त्यातील एकही खर्च ङ्गअचानकफउद्भवल्याचे दिसत नाही. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेफ्साठी २० हजार कोटी रुपयांच्या मागण्यांचा मुद्दा बाजूला ठेवला, तरी उरलेल्या ७८ हजार कोटी रुपयांचे काय, हा प्रश्न उरतोच. त्यामध्ये अनिवार्य खर्च सुमारे १४ हजार कोटी रुपये, कार्यक्रमाअंतर्गत खर्चासाठी ६६ हजार कोटी रुपये, केंद्रीय योजनांमधील खर्चाचा वाटा म्हणून १७ हजार कोटी रुपये, ङ्ग महावितरण मच्या कर्जफेडीसाठी आठ हजार कोटी रुपये आणि मुंबई मेट्रो , भुयारी मार्ग व पुणे रिंगरोड अशा मागण्यांचा समावेश आहे. अशा योजनांवर खर्च होणार; केंद्राच्या योजनांसाठी मॅचिंग ग्रांटफ द्यावीच लागणार, हे अर्थसंकल्प मांडताना नियोजन विभागाला ठाऊक नव्हते का? विशेषत: नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्याची पर्वणी ही ङ्गअचानकफ उद्भवलेली नसून, त्या खर्चासाठी अचानक तोंडमिळवणी करण्याची वेळ का यावी आणि ङ्गअनिवार्यफ म्हणवल्या जाणाऱ्या खर्चांचा नियोजन विभागाला अवचित साक्षात्कार कसा व्हावा, अशा प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळालीच पाहिजेत. काही विकासकामांमध्ये भूसंपादनासारख्या अडचणी येतात, किंवा क्वचित खर्चातही वाढ होते, असे पूर्वानुभव आहेत. त्यामुळे त्याच्या तरतुदींमध्ये आधीच पैसे अडकवून ठेवणे अव्यवहार्य ठरते, हे मान्य; परंतु ही रक्कम एक लाख कोटी रुपयांपर्यंत जावी, हे समर्थनीय नाही. एखाद्या गरीब कुटुंबातल्या गृहिणीची महिन्याअखेरीला हातातोंडाशी गाठ यावी, तशी वेळ तज्ज्ञांची फौज हाताशी असलेल्या संपन्न महाराष्ट्रापुढे का येते, ही विचार करण्याजोगी बाब नक्कीच. आर्थिक शिस्तफ हा प्रगतीचा पाया आहे, याचे विस्मरण होऊन चालणार नाही. आपत्तीमध्ये पूर्वीचे नियोजन बाजूला ठेवून तिजोरी खुली करावीच लागते; परंतु विकास साधण्यासाठी दीर्घकालीन नियोजनाला सोडचिठ्ठी देणे, हे आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतल्यासारखे होईल. पुरवणी मागण्यांचे प्रमाण अर्थसंकल्पाच्या पाच टक्क्यांच्या आत असावे, असे जाणकार सांगतात, पण हल्ली त्या मर्यादेचे उल्लंघन, ही नित्याची बाब ठरली आहे. त्यामुळेच हा अतिरेक म्हणजे नियोजन कोलमडून पडण्याचे निदर्शक आहे, की त्यामागेही काही नियोजन आहे, अशी शंका आल्यावाचून राहत नाही. गेल्या काही दशकांमध्ये राजकीय फायद्यासाठी लोकानुनय, हे सर्वच सरकारांचे व्यवच्छेदक लक्षण बनले असून, अर्थसंकल्प आणि निवडणुकीच्या जाहीरनाम्यांमधील सीमारेषा पुसट झाल्या आहेत. अर्थसंकल्पात लोकानुनयी उधळपट्टीच्या योजनांचा पाऊस पाडला जातो आणि दोन महिन्यांनी चोरपावलांनी मागण्यांच्या पुरवण्या सादर होतात; ङ्गआता हे सगळे खर्च करण्याविना पर्याय नाही,फ असा दबाव आणून ते मान्य करवून घेतले जातात. मग लोकप्रिय घोषणांसाठी एक आणि अनिवार्य खर्चासाठी दुसरा, असे सरळसरळ दोन अर्थसंकल्प मांडण्याचा ङ्गक्रांतिकारीफ पायंडा सुरू करण्यास काय हरकत आहे? तशीही अन्य राज्यांना दिशा देण्याची आपली परंपरा आहेच की!




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पावसाळी अधिवेशनाचा दुसरा दिवस ; सत्ताधारी आणि बाकांवरील आमदारांमध्ये मोठी खडाजंगी

## प्रत्येक पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी कार्यवाहीसाठी स्वतंत्र युनिट

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्यातील अमली पदार्थांची विक्री, तस्करी आणि सेवन रोखण्यासाठी राज्य शासनाकडून व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. अमली पदार्थ व्यापार व सेवनाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील पोलीस ठाण्यात अमली पदार्थविरोधी कार्यवाहीसाठी स्वतंत्र युनिट उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी 'तिहेरी तलाक' , बहुपत्नीत्व आणि 'समान नागरी कायदा' या अत्यंत संवेदनशील विषयांवरून सत्ताधारी आणि विरोधी बाकांवरील आमदारांमध्ये मोठी



खडाजंगी पाहायला मिळाली. राज्यातील अमली पदार्थ विक्री व सेवनासंदर्भात सदस्य सुनील प्रभू यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी सदस्य सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, अमीन पटेल, योगेश सागर आणि संजय क्षीरसागर यांनी उपप्रश्न उपस्थित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अमली पदार्थांचे उत्पादन, तस्करी आणि सेवन हे केवळ महाराष्ट्रासमोरील नव्हे तर संपूर्ण देशासमोरील गंभीर आव्हान आहे.गृह विभागाच्या माध्यमातून विविध विभागांमध्ये समन्वय साधून अवैध अमली पदार्थांची शेती, लागवड, उत्पादन, व्यापार, वाहतूक, विक्री आणि सेवन यांवर नियंत्रण आणण्यासाठी व्यापक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर देत सरकार प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी सक्षम असल्याचा दावा केला आहे. विधानभवनाच्या पायऱ्यांवरील आंदोलन, सभागृहातील गदारोळ, नेत्यांमधील आरोप-प्रत्यारोप आणि महत्त्वाच्या घोषणांमुळे अधिवेशनाचा दुसरा दिवस चांगलाच गाजल्याचे पाहायला मिळाले.

### नवनिर्वाचित सदस्यांनी घेतली विधानपरिषद सदस्यत्वाची शपथ..

विधान परिषदेच्या सभागृहात नवनिर्वाचित सदस्यांनी सदस्यत्वाची शपथ घेतली. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी त्यांना शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य, विधान परिषदेमधील सदस्य उपस्थित होते. नवनिर्वाचित सदस्य प्राजक्त प्रसादराव तनपुरे, रवींद्र सदाशिव फाटक, अनिकेत सुनील तटकरे, दुष्यंत सतीश चतुर्वेदी, विक्रम काकडे, अरुण लखानी, बसवराज माधवराव पाटील, प्रवीण रामचंद्र पोटे-पाटील, अमरनाथ अनंतराव राजूरकर, राजेंद्र विठ्ठल राऊत, धैर्यशील कदम, गोकुळ गीते, डॉ. राजीव पोतदार, अविनाश ब्राह्मणकर, नंदकिशोर महाजन, सुहास शिरसाट यांनी सदस्यत्वाची शपथ घेतली.

## कृषी दिनी १८९ शेतकरी, संस्था व कृषी अधिकारी यांचा होणार सन्मान

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्यातील कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि कृषी क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शेतकरी, महिला शेतकरी, तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २०२३ व २०२४ चे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार जाहीर केले आहेत. कृषी विकासासाठी केलेल्या योगदानाचा सन्मान करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. राज्यस्तरीय कृषी पुरस्कार हे कृषी क्षेत्रातील उत्कृष्टतेचे प्रतीक असून नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून बुधवार, १ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे हा सोहळा होणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची भेट घेऊन या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण



दिले. या निमंत्रणाचा स्विकार राज्यपाल यांनी केला असून त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समिती बैठकीत पुरस्कारार्थींची निवड करण्यात आली असून शासनाने त्यास मान्यता दिली आहे. राज्यातील कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि कृषी विस्तार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार दरवर्षी प्रदान करण्यात येतात.

## केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** केंद्रीय राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांनी मंत्रिमंडळातून राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती भवनाने मंगळवारी कुरियन यांच्या राजीनाम्याची माहिती दिली. प्रेस रिलीझमध्ये असे सांगण्यात आले की, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सल्ल्यानुसार



त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. मात्र, राजीनाम्याचे कारण स्पष्ट करण्यात आलेले नाही. 65 वर्षीय कुरियन हे केरळमधील भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांपैकी एक आहेत. 21 जून रोजी त्यांचा 6 वर्षांचा राज्यसभा कार्यकाळ संपला होता. 18 जून रोजी झालेल्या निवडणुकीत भाजपने त्यांना पुन्हा उमेदवारी दिली नव्हती. जॉर्ज कुरियन ऑगस्ट 2024 ते जून 2026 पर्यंत मध्य प्रदेशमधून राज्यसभा खासदार होते. असे मानले जात आहे की, अलीकडील केरळ विधानसभा निवडणुकीत पक्षाने अपेक्षेप्रमाणे कामगिरी न केल्यामुळे त्यांना पुन्हा संधी मिळाली नाही.

## 'होर्मुज 'मधील वाहतूक पूर्ववत ; भारताची दोन जहाजे पारसच्या आखातात दाखल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**



होर्मुज जलमार्गावरील जहाजांच्या नियमित वाहतुकीबाबत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. या मार्गावरील वाहतूक आता सुरळीतपणे सुरू असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, "आजच्या तारखेपर्यंत, भारतीय ध्वज असलेली आमची १० जहाजे अजूनही पारसच्या आखाती भागात आहेत. या १० जहाजांव्यतिरिक्त, आमची आणखी दोन भारतीय जहाजे या बाजूने पारसच्या आखातात दाखल झाली आहेत. याचा अर्थ जहाजांची ये-जा सुरळीतपणे सुरू आहे."

अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर, पुन्हा एकदा इराणी सैन्याकडून होर्मुज जलमार्ग बंद करण्याची घोषणा करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी करत होर्मुजमधील परिस्थिती सामान्य असल्याचे सांगितले आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी माहिती दिली की, इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताचे दोन टँकर पारसच्या आखातात गेले आहेत.

१७ जून रोजी सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यापासून, भारताकडे येणारी ११ जहाजे होर्मुज जलमार्गातून गेली आहेत. या जहाजांमध्ये भारतीय ध्वज असलेल्या कच्च्या तेलाच्या तीन टँकर्सचा समावेश आहे. प्रत्येकामध्ये २,८५,००० मेट्रिक टन कच्चे तेल आहे. यासोबतच परदेशी ध्वज वाहक असलेले एक एलपीजी कॅरियर, परदेशी ध्वज असलेले कच्चे तेलाचे एक टँकर आणि खते भरलेली परदेशी ध्वज असलेली सहा बल्क कॅरियर जहाजे आहेत.

## 'जलसंधारण खाते मोहित कंबोज चालवतात; राज्य सरकारची कर्जमाफी फसवी'

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्य सरकारने जाहीर केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना - 2026 ही प्रत्यक्षात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी नसून कर्जवसुली योजना आहे. या योजनेतील अटी-शर्ती पाहता शेतकऱ्यांना त्याचा किती फायदा होणार याबाबत मोठी शंका आहे, असा गंभीर आरोप शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांनी मंगळवारी केला. यावेळी त्यांनी जलसंधारण खाते मोहित कंबोज चालवतात. ते सत्ताधाऱ्यांचे कोण लागतात, असा सवालही केला. त्यामुळे विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये खडाजंगी झाली.

महाराष्ट्र विधान परिषदेत नियम 260 अन्वये झालेल्या चर्चेत बोलताना दानवे यांनी सत्ताधारी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावाला जोरदार विरोध केला. "लबाडाच्या घरची खीर कधी खायला मिळेल याची खात्री नसते, तशीच राज्य सरकारच्या आश्वासनांची अवस्था आहे," असा टोला दानवे यांनी राज्य सरकारला लगावला.

जलसंधारण, जलसंपदाचे खाते मोहित कंबोज चालवतात. विभागातले अधिकारी मोहित कंबोज यांना फोन करा म्हणतात. मोहित कंबोज सत्ताधाऱ्यांचे कोण लागतो, असा सवाल अंबादास दानवे यांनी विधान परिषदेत केला. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये खडाजंगी झालेली पाहायला मिळाली.

2025-26 या कालावधीत देशातील 15 हजार 179 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी 6 हजार 93 आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. देशातील सुमारे 40 टक्के शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत असताना सरकारकडून प्रभावी उपाययोजना दिसत नसल्याचा आरोप दानवे यांनी केला.

### अनेक शेतकरी कर्जमाफीच्या कक्षेबाहेर

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने 2019 मध्ये केलेली कर्जमाफी कोणत्याही अटींशिवाय आणि थेट शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचली होती. मात्र सध्याच्या योजनेत तब्बल 17 अटी-शर्ती लावण्यात आल्या असून अनेक शेतकरी या कर्जमाफीच्या कक्षेबाहेर राहणार असल्याचा दावा अंबादास दानवे यांनी केला.



# दिवंगत विक्रम गोखले यांचा शेवटचा चित्रपट 'बेवारस-सत्य एका वळणावरचं' चा टीजर लॉंच

मराठी रंगभूमी आणि मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते विक्रम गोखले यांच्या अखेरच्या चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. 'बेवारस – सत्य एका वळणावरचं' या चित्रपटाचा टीजर नुकताच प्रदर्शित करण्यात आला असून, त्यातील हृदयस्पर्शी कथानक, दमदार कलाकारांची फळी आणि भावनिक मांडणी यामुळे चित्रपटाविषयीची उत्सुकता वाढली आहे. हा चित्रपट २५ जून रोजी जगभर प्रदर्शित होणार आहे.

हरिणी प्रॉडक्शन्स निर्मित आणि शिव आर्यन फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती रिया कुमार, नितीन विचारे आणि शिव आर्यन यांनी केली आहे. चित्रपटाची कथा विजय राणे यांची असून दिग्दर्शन विजय राणे आणि रिया कुमार यांनी केले आहे. क्रिएटिव्ह दिग्दर्शन नितीन विचारे यांचे आहे. चित्रपटाची पटकथा आणि संवाद लेखन शिरीष लाटकर यांनी केले असून गीतलेखन आणि संगीत






दिग्दर्शन विवेक आपटे यांचे आहे. शीर्षक गीताचे लेखन रिया कुमार यांनी केले असून संगीत बिपलाब दत्ता यांचे आहे. यूजीन डिसोझा आणि योगेश कोळी यांनी छायांकन, अमीर हडकर यांनी पार्श्वसंगीत, तर यश सुर्वे यांनी संकलनाची जबाबदारी सांभाळली आहे. स्टार कास्टिंग नितीन विचारे यांनी केले आहे. चित्रपटात विक्रम गोखले यांच्यासोबत तेजस्विनी पंडित, रोहिणी हत्तांगडी, उषा नाईक, ऋतुजा बागवे, उदय टिकेकर, श्रीजित मराठे आणि आदित्य देशमुख यांच्यासह अनेक कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटात विक्रम गोखले यांनी अनाथालय चालवणाऱ्या तत्त्वनिष्ठ आबाजींची भूमिका साकारली आहे. पायाने अधू असलेल्या एका अनाथ मुलाच्या न्यायासाठीच्या कोर्ट-कचेरीतील संघर्षाची कथा या चित्रपटात उलगडणार आहे. सामाजिक वास्तव आणि मानवी भावनांचा स्पर्श असलेल्या या कथानकामुळे चित्रपटाला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. टीजरमध्ये विक्रम गोखले यांच्या आर्त आणि भावनिक अभिनयाची प्रभावी झलक पाहायला मिळते. त्यांचा अनुभवसंपन्न अभिनय, हृदयाला भिडणारे कथानक आणि दमदार कलाकारांमुळे प्रेक्षकांना एक उत्कृष्ट सिनेमॅटिक अनुभव मिळणार असल्याची खात्री टीजरमधून दिसून येते.

## प्रवीण तरडे यांचा ट्रोलरवर पलटवार

देऊळ बंद चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाल्यानंतर तब्बल ११ वर्षांनी प्रवीण तरडे यांनी या चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांसमोर आणला. मोहन जोशी, स्नेहल तरडे यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या या चित्रपटाला मुंबई, पुण्यामध्ये जबरदस्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रभरात बहुतांश ठिकाणी प्रेक्षकांची पसंती या चित्रपटाला मिळाली. अनेकांनी या चित्रपटाला ट्रोलही केले. यावर अलीकडेच दिलेला मुलाखतीत प्रवीण तरडे म्हणाले 'जे देव मानत नाहीत त्यांना हा सिनेमा जास्त झोंबला. माझ्या देवाचा उदो उदो मीच करणार. त्यामुळे मी तो केला. त्याचा कोणाला त्रास झाला याबद्दल मला काही देणेघेणे नाही. उलट मी जास्त आनंदी झालो. म्हणजे 'तीर निशाने पे लगा है.'

दिग्दर्शक प्रवीण तरडे म्हटले, की एक रांगडा राकट माणूस डोळ्यासमोर येतो. आपल्या चित्रपटाच्या कथानकामुळे, ठसकेबाज, रोखठोक बोलल्यामुळे कायम चर्चेत असतात. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या देऊळ बंद २ सिनेमात बायकोला प्रमुख रोल दिल्याने त्याच्यावर टीका झाली. शिवाय अनेकांनी श्रद्धेच्या नावावर सुरू असलेला भंपकपणा दाखवत असल्याची टीकाही त्यांच्यावर केली. मात्र, या सगळ्यावर प्रवीण तरडे यांनी थेट उत्तर दिले आहे.

शेतकऱ्यांचा आत्महत्या थांबण्यासाठी माझा देव मैदानात उतरला आहे. शेतकरी बनवून तो बांधा बांधावर फिरला. ग्रामीण भागात थेरडा म्हणण्याची पद्धत आहे. पण देवाने तेही हसत हसत स्वीकारले. कुठल्याही चमत्काराशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवली. मी माझ्या धर्माचे - देवाचे पालन केले नाही तर फॉरेनवरून कोणी येणार आहे का? त्यामुळे हे ट्रॉलिंग मी मजेने घेतो असे प्रमाण तरडे म्हणाले.



***

## मल्याळम अभिनेते सलीम कुमार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



मल्याळम चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सलीम कुमार यांनी आपल्या विनोदी अभिनयाने प्रेक्षकांचे मनोरंजन केले आणि विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या. प्रेक्षकांना त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवेल. वयाच्या ५७ व्या वर्षी या अभिनेत्याचे निधन झाले आहे.

शनिवारी सकाळी अभिनेते सलीम कुमार यांची प्रकृती खालावली. त्यांना कोची येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि नंतर व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. काही वर्षांपूर्वी सलीम कुमार यांना लिव्हर सिरोसिसचे निदान झाले होते आणि त्यांच्यावर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियाही झाली होती. शनिवारी रात्री उशिरा त्यांच्या निधनाची माहिती समोर आल्याने चाहते आणि मल्याळम चित्रपट कलाकारांमध्ये दुखाची लाट पसरली आहे.

मल्याळम चित्रपटसृष्टीतील दिग्गज ममूटी यांनी सलीम कुमार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी एका ट्विटमध्ये लिहिले, सलीम, जो स्वतः हसायचा आणि इतरांनाही हसवायचा. जो विचार करायचा आणि इतरांनाही विचार करायला लावायचा. आणि कधीकधी स्वतः रडायचा आणि इतरांनाही रडवायचा. आता, तू फक्त मला रडवत आहेस. प्रिय मित्रा, तुझे जाणे हे एक कधीही न संपणारे दुख आहे.

चित्रपटांमध्ये येण्यापूर्वी ते नाट्यक्षेत्र आणि नक्कल कलेत कार्यरत होते. त्यांनी १९९७ मध्ये आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरुवात केली आणि मल्याळम चित्रपटसृष्टीत विनोदी ते गंभीर अशा विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या आहेत. सलीम कुमार यांना चार केरळ राज्य चित्रपट पुरस्कार मिळाले आहेत. २०१० मध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्यासाठी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. एक अभिनेता असण्याव्यतिरिक्त, सलीम कुमार मल्याळम चित्रपटसृष्टीत दिग्दर्शक आणि लेखक म्हणूनही सक्रिय होते.

## तापसी पन्नूचे सोशल मीडियावर कमबॅक



बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नू वर्षभर सोशल मीडियापासून दूर राहिल्यानंतर अखेर डिजिटल विश्वात परतली आहे. परतल्यानंतर तिला चाहत्यांनी ती कुठे गायब झाली होती, असे विचारले. याबाबत अभिनेत्रीने धक्कादायक खुलासा केला आहे. सततच्या दबावाला कंटाळून तिने पडद्याबाहेर आपले खरे आयुष्य जगण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

तापसीने सांगितले की, जेव्हा तिने सोशल मीडियावर पोस्ट करणे कमी केले, तेव्हा तिचे मित्र आणि चाहते काळजीत पडले. लोक तिला सगळे ठीक आहे ना?, तू कुठे गायब झाली आहेस?, तुझी फीड चित्रपटांच्या पोस्टर्स आणि ब्रँडच्या जाहिरातींनी भरलेली आहे, तू तुझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काहीच का पोस्ट करत नाहीस? असे वेगवेगळे प्रश्न विचारू लागले.

सोशल मीडियावर कमबॅक करताच तापसीने स्पष्ट केले की, तिचे सोशल मीडिया मॅनेज करण्यासाठी तिच्याकडे कोणतीही व्यावसायिक टीम नाही किंवा ती त्यावर पैसेही खर्च करत नाही. तिचे अकाउंट पूर्णपणे अनफिल्टर्ड आणि नैसर्गिक आहे, अगदी तिच्या खऱ्या आयुष्यासारखेच. तापसी म्हणाली,

आजकाल कंपन्या अशा कलाकारांना प्राधान्य देतात जे ऑनलाइन खूप सक्रिय असतात. ती कमी पोस्ट करत असल्यामुळे काही ब्रँड्सनी तिच्यासोबत पार्टनरशिप करायला नकार दिला. जाहिराती हे कलाकारांसाठी उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे आणि कंपन्यांना फक्त प्रसिद्धी हवी असते. आज सोशल मीडिया सेलिब्रिटींसाठी केवळ एक मार्केटिंगचे साधन बनले आहे.

या व्यावसायिक मानसिकतेला तीव्र विरोध करत तापसीने प्रश्न विचारला की, कलाकारांनी मार्केटिंगच्या उद्देशाने स्वतःमध्ये बदल करायला हवा का? ती म्हणाली, जर एखादा ब्रँड माझ्याशी संपर्क साधतो, तर ते माझ्या व्यक्तिमत्त्वामुळे माझी निवड करतात. जर मला त्यांच्यामुळे दुसऱ्या कोणाची तरी भूमिका करावी लागत असेल, तर माझी स्वतःची ओळख तरी कुठे उरते? सोशल मीडिया मनोरंजन विश्वाचा एक भाग असाव पण स्वतःचे अस्तित्व गमावून नाही.

***

# वसतिगृह प्रवेश व पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेसाठी ऑनलाइन अर्ज सुरू

जनसंचलन/बुलढाणा

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, अकोला यांच्या अधिपत्याखालील अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील १६ शासकीय आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहांमध्ये प्रवेश तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी नवीन तसेच नूतनीकरण अर्ज निर्धारित संकेतस्थळावर भरावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी मोहनकुमार ग. व्यवहारे यांनी केले आहे. वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वयंम योजनेसाठी स्वतंत्र अर्ज करता येणार नाही. वसतिगृह प्रवेशासाठी निवड न झालेल्या विद्यार्थ्यांनाच स्वयंम योजनेत समाविष्ट करण्यात येणार आहे. तसेच गुणवत्ता यादीत निवड झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेश निश्चित न केल्यास किंवा अर्ज रद्द केल्यास स्वयंम योजनेचाही लाभ मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या योजनांचा लाभ प्री-मॅट्रिक, कनिष्ठ महाविद्यालय, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना घेता येणार आहे. अर्जासाठी आधार कार्ड, जात प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार जात वैधता प्रमाणपत्र, प्रवेश पावती, बोनाफाईड प्रमाणपत्र, शैक्षणिक खंड असल्यास गॅप प्रमाणपत्र, शासकीय वैद्यकीय प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, बँक पासबुक, मागील वर्षाची गुणपत्रिका, अधिवास प्रमाणपत्र, टी.सी. आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. योजनेसंदर्भात शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व कालमर्यादांचे पालन विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक राहणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी जवळच्या शासकीय आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुरेसा ओलावा झाल्यानंतरच पेरणी करा शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा झाल्याशिवाय सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कपाशी आदी पिकांची पेरणी करू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, शेतातील जमिनीमध्ये किमान ६ इंच ओलावा अथवा ७५ ते १०० मि.मी. पाऊस झाल्यानंतरच पेरणी करणे आवश्यक आहे. पुरेसा ओलावा नसताना घाईघाईने पेरणी केल्यास जमिनीतील उष्णतेमुळे बियाण्यांचे अंकुरण कमी होण्याची किंवा अंकुर जळण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाढण्याची शक्यता असल्याने कृषी विभागाने सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. काही ठिकाणी शेतकरी धूळपेरणी करत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा प्रकारची घाई टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, जिल्ह्यात सध्या समाधानकारक पावसाची सुरुवात झाली असून, पावसाची स्थिती लक्षात घेऊनच पेरणीचे नियोजन करावे. जमिनीतील उष्णता कमी होऊन आवश्यक ओलावा निर्माण झाल्यानंतर सर्व प्रकारच्या खरीप पिकांची पेरणी करता येईल, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. संतोष डाबरे यांनी केले आहे.

# बुलडाणा जिल्ह्यात २४ जूनअखेर सरासरी ३३.२ मि.मी. पावसाची नोंद; शेगाव तालुक्यात सर्वाधिक पाऊस

जनसंचलन/बुलढाणा



बुलडाणा जिल्ह्यात चालू पावसाळी हंगामात २४ जून २०२६ पर्यंत एकूण सरासरी ३३.२ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण जिल्ह्याच्या एकूण सर्वसाधारण पर्जन्यमानाच्या (७६१.६ मि.मी.) तुलनेत ४.३६ टक्के एवढे आहे. मागील वर्षी याच दिनांकापर्यंत जिल्ह्यात ६३.७ मि.मी. पाऊस पडला होता. जिल्हा प्रशासनाच्या २४-०६-२०२६२६०६२४१६५३३८. या अधिकृत अहवालानुसार ही आकडेवारी समोर आली आहे. तालुकावार पावसाची आकडेवारी पाहता, जिल्ह्यात यंदाच्या हंगामात आतापर्यंत शेगाव तालुक्यात सर्वाधिक ५६.९ मि.मी. म्हणजे सर्वसाधारण पर्जन्यमानाच्या ८.३४ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्याखालोखाल चिखली तालुक्यात ५१.२ मि.मी., नांदुरा तालुक्यात ४६.६ मि.मी., जळगांव जामोद तालुक्यात ४५.१ मि.मी., संग्रामपूर तालुक्यात ४४.३ मि.मी. आणि बुलडाणा तालुक्यात ४१.१ मि.मी. पाऊस पडला आहे. यासोबतच खामगांव तालुक्यात ३५.५ मि.मी., सिंदखेड राजा तालुक्यात ३०.९ मि.मी., देऊळगांव राजा तालुक्यात २३.१ मि.मी. आणि मोताळा तालुक्यात १९.५ मि.मी. पावसाची नोंद झाली असून मेहकर तालुक्यात १४.५ मि.मी. व लोणार तालुक्यात १४.२ मि.मी. पाऊस झाला आहे. जिल्ह्यात सर्वात कमी पाऊस मलकापूर तालुक्यात अवघा ८.६ मि.मी. म्हणजेच सर्वसाधारण पावसाच्या १.२२ टक्के नोंदवला गेला आहे. महसूल मंडळांचा विचार केला असता जळगाव जामोद तालुक्यातील जामोद मंडळात सर्वाधिक ७७.७ मि.मी. तर पिंपळगाव काळे मंडळात सर्वात कमी ५.३ मि.मी. पाऊस झाला आहे. चिखली तालुक्यातील अंबाडापूर मंडळात ७५.१ मि.मी. तर उंद्री मंडळात ३०.८ मि.मी. पाऊस पडला असून बुलडाणा तालुक्यातील म्हसला मंडळात ६१.४ मि.मी., धाड मंडळात २५.३ मि.मी. तर रायपूर मंडळात पाऊस निरंक आहे. शेगाव तालुक्यातील मानसगाव मंडळात ७६.० मि.मी., शेगाव मंडळात ७३.६ मि.मी. तर जळंब मंडळात ७२.५ मि.मी. अशा चांगल्या पावसाची नोंद झाली आहे. विलंबाने प्राप्त होणाऱ्या आकडेवारीमुळे काही मंडळांमधील पावसाचा अंतिम अहवाल पुढील तीन दिवसांत अद्ययावत केला जाऊ शकतो, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

# एकल महिलांच्या मदतीसाठी जिल्हा प्रशासन खंबीर; ३० जून रोजी जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन



जनसंचलन/बुलढाणा

जागतिक एकल महिला दिनानिमित्त जिल्हा महिला व बाल विकास विभाग, कृषी समृद्धी मल्टिपर्पज फाउंडेशन आणि आस्था संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने २३ जून रोजी सखी निवास येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बोलताना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी संकटांशी दोन हात करत कुटुंबाचा गाडा हाकणाऱ्या एकल महिलांच्या पाठीशी जिल्हा प्रशासन खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. शासन स्तरावर सध्या एकल महिलांसाठी सर्वसमावेशक धोरण तयार केले जात असून या धोरणात कोणत्या घटकांचा समावेश असावा, याबाबत एकल महिलांनी आपल्या लेखी सूचना प्रशासनाकडे सादर कराव्यात, असे आवाहन अमोल डिघुळे यांनी केले. या धोरणाच्या पार्श्वभूमीवर आगामी ३० जून रोजी जिल्हा परिषद बुलढाणा येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून या चर्चासत्रात जिल्ह्यातील एकल महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली स्पष्ट मते मांडावीत, असे आवाहनही त्यांनी पुढे बोलताना केले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाने हे एकल महिला धोरण निश्चित करण्यासाठी पुढाकार घेतला असून महिलांनी स्वतः पुढे येऊन आपले प्रश्न मांडणे गरजेचे असल्याचे मत मिशन वात्सल्य समितीच्या सदस्या आशा सिरसाट यांनी व्यक्त केले. तसेच एकल महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजनांचा व कर्जाचा लाभ घ्यावा, बँकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रशासन पूर्ण सहकार्य करेल, असा विश्वास मिटकॉनचे जिल्हा समन्वयक कैलास खराटे यांनी दिला. या प्रसंगी जिल्हा परिविक्षा अधिकारी सुरेषा पवार, रामेश्वर वसू व महेंद्र सौभागे यांनीही उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

# आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त बुलढाण्यात संपन्न झाले विधवा महिला चर्चासत्र

जनसंचलन-बुलढाणा

२३ जून हा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय विधवा महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याच दिनाचे औचित्य साधून मानस फाउंडेशन बुलढाणा यांच्यातर्फे विधवा महिला चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मानस फाउंडेशनचे अध्यक्ष डी एस लहाने सर, व मानस फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी भगिनी शहीना ताई पठाण, सुरेखा सावळे प्रज्ञा लांजेवार प्रतिभा भुतेकर अनिता कापरे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. या चर्चासत्रासाठी जिल्हाभरातून अनेक विधवा महिला भगिनी उपस्थित होत्या. या चर्चासत्रात विधवा महिलांच्या आयुष्यात येणाऱ्या अडीअडचणी त्यासाठी शासनाने काय दखल घ्यावी अशा अनेक गोष्टींचा उलघडा समोर आला. गेल्या



दहा वर्षापासून मानस फाउंडेशन विधवा महिलांसाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर संपूर्ण देशात कार्य करत आहे. मानस फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत १५० पेक्षा जास्त विधवा महिलांचा पुनर्विवाह मानस फाउंडेशनच्या माध्यमातून संपन्न झाले. त्या चर्चासत्रात विधवा महिलांच्या आयुष्यातील समस्या व त्यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजे अशा अनेक गोष्टींचा उलगडा त्या ठिकाणी सामोर आला. विधवा महिलांच्या आयुष्यात किती संघर्ष असतो किती अडीअडचणी असतात त्यादेखील चर्चासत्रांच्या माध्यमातून समोर आल्या. या चर्चासत्रात विधवा महिलांच्या अडीअडचणी आहेत. एकल महिलांचा सन्मान करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य. डी एस लहाने त्या प्रशासनासमोर मांडण्याचे आवाहन मानस फाउंडेशनचे अध्यक्ष डी एस लहाने सर यांनी सर्व विधवा महिला भगिनींना दिले आहे.

# बुलडाणा येथे माहेश्वरी समाज वंशोत्पत्ती दिवस महेश नवमी उत्साहात साजरी.

## भगवान शंकराच्या सानिध्यात वैरीही एकत्र, मग संसारात मतभेद का ? भाईजी राधेश्याम चांडक

जनसंचलन-बुलढाणा

भगवान शंकराच्या सानिध्यात त्यांच्या गळ्यातील नाग, त्यांचे वाहन नंदी, माता पार्वतीचे वाहन वाघ, कार्तिकेयचे वाहन मोर व गणपतीचे वाहन उंदीर हे सर्व एक दुसऱ्यांचे वैरी असूनही गुण्यागोविंदाने एकत्र राहतात, मग संसारामध्ये मानव समाजात मतभेद का ?? असे प्रतिपादन बुलडाणा अर्बन चे सर्वेसर्वा भाईजी राधेश्याम चांडक यांनी महेश नवमी निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात केले. सेवा,त्याग व सदाचार या त्रिसूत्री मध्ये सदैव अग्रेसर असलेल्या माहेश्वरी समाजाचा वंशोत्पत्ती दिवस म्हणून देशभरात महेश नवमी साजरी केली जाते. स्थानिक बुलडाणा येथे मंगळवार दि.२३ जून रोजी सकाळी श्री.महेश भगवान यांचा अभिषेक करून शहरातील मुख्य मार्गाने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेमध्ये समाजातील ज्येष्ठ नागरिक, बंधू ,भगिनी, युवक, युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सचिन गांधी व सौ.खुशी गांधी यांनी धारण केलेली श्री.शंकर पार्वती यांची वेशभूषा आकर्षक ठरली. जय महेश च्या उद्घोषाने परिसर दुमदुमून गेला.सोबतच विविध कार्यक्रम जसे की जागतिक योग दिन, वृक्षारोपण-वृक्षसंवर्धन, रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. महेश नवमी प्रित्यर्थ सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन बुलडाणा अर्बन च्या गोवर्धन सभागृहात करण्यात आले. यामधे सुरुवातीला शिवतांडव नृत्य व महेश पूजन करून महेश वंदना प्रस्तुत करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर बुलडाणा अर्बन चे संस्थापक राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, बुलडाणा अर्बन अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, माहेश्वरी मंडळ अध्यक्ष महेंद्र झंवर, माहेश्वरी महिला मंडळ सचिव मीनल मुंदडा, उपाध्यक्ष प्रेमा राठी व माहेश्वरी युवा संगठण चे जिल्हाध्यक्ष कन्हैया बंग यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ.सुकेश झंवर यांनी आपल्या देशाच्या प्रगतीसाठी माहेश्वरी समाजाचे योगदान या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. माहेश्वरी कार्यकारिणी द्वारे घेण्यात आलेल्या समाजउपयोगी कार्यक्रमांची प्रस्तावना डॉ.पवन बजाज यांनी सांगितली.सांस्कृतिक कार्यक्रमात लहान मुलांसाठी आयोजित ‌‌शिव गुण चिंतन‌‌स्पर्धेमध्ये बालकांची प्रस्तुती उपस्थितांसाठी





आकर्षक ठरली. कार्यक्रमादरम्यान प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे, विशेष पुरस्कार प्राप्त व्यक्तींचे, रक्तदात्यांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोपटे देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी माहेश्वरी मंडळ ची नवीन कार्यकारिणी जाहीर करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अध्यक्षपदी नरेश मुंदडा, सचिव निलेश बाहेती, उपाध्यक्ष अशोक बजाज, रतनलाल तापडिया, कोषाध्यक्ष रितेश लड्डा, प्रसिद्धीप्रमुख डॉ.पवन बजाज व इतर सदस्यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचा शेवट स्नेहभोजनाने करण्यात आला.कार्यक्रमाच्या नियोजनासाठी माहेश्वरी मंडळ, माहेश्वरी महिला मंडळ व माहेश्वरी नवयुवक मंडळ च्या सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ.मिरा चांडक व आभार प्रदर्शन नितीन डोडिया यांनी केले.

# माहिती अधिकार नियम २०२६ नागरिकांच्या माहितीच्या अधिकारावर निर्बंध की पारदर्शकतेवर आघात?

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६ विरोधात राज्यभरातील माहिती अधिकार कार्यकर्ते, सामाजिक संघटना, पत्रकार आणि जागरूक नागरिकांकडून तीव्र आक्षेप नोंदविण्यात येत आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते तथा महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विधी व न्याय विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि राज्य माहिती आयोगाकडे सविस्तर निवेदन सादर करून संबंधित नियमांमधील अनेक तरतुदी या माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या मूळ उद्देश, तरतुदी आणि घटनात्मक अधिकारांशी विसंगत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. निवेदनानुसार माहिती अधिकार कायदा हा देशातील प्रत्येक नागरिकाला शासनाच्या कामकाजाबाबत माहिती मिळविण्याचा कायदेशीर अधिकार प्रदान करतो. या कायद्यामुळेच अनेक कोटी रुपयांचे घोटाळे, भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार, शासकीय निधीचा अपहार, बोगस लाभार्थी, घरकुल घोटाळे, ग्रामपंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनियमितता तसेच विविध विभागांतील गैरव्यवहार उघडकीस आले आहेत. त्यामुळे माहिती अधिकार कायदा हा लोकशाही व्यवस्थेतील सर्वात प्रभावी आणि पारदर्शकतेचा आधारस्तंभ मानला जातो. मात्र महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या माहिती अधिकार नियम २०२६ मध्ये अर्जदारांवर नवीन अटी, निर्बंध आणि शुल्क लादण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, अर्जातील विषयांची मर्यादा, शब्दसंख्येची मर्यादा, ओळखपत्र जोडण्याची सक्ती, अपील शुल्क आकारणी, माहिती नाकारण्याचे विस्तारित अधिकार, तसेच अपील मागे घेतल्यास खर्च किंवा दंड आकारण्यासंबंधीच्या तरतुदी या नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणणाऱ्या असल्याचे म्हटले आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ नुसार कोणताही नागरिक कारण न देता माहिती मागू शकतो. तसेच अर्जदाराची ओळख अनावश्यकपणे उघड करण्याची सक्ती कायद्यात नाही. तरीसुद्धा ओळखपत्राची सक्ती करण्यात आल्याने नागरिकांच्या गोपनीयतेच्या अधिकारावर परिणाम होऊ शकतो. विशेषतः भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार उघड करणाऱ्या नागरिकांना दबाव, धमक्या किंवा त्रास सहन करावा लागू शकतो. तसेच ‌‌माहिती पूर्वी देण्यात आली आहे, संकेतस्थळावर उपलब्ध आहे‌‌ किंवा इतर तांत्रिक कारणे दाखवून माहिती नाकारण्याचे अधिकार वाढविल्यामुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक क्लिष्ट आणि मर्यादित होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. माहिती आयोगाकडे अपील करण्यासाठी अतिरिक्त शुल्क आकारण्याची तरतूद देखील न्यायप्राप्तीच्या मार्गातील अडथळा ठरू शकते, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनात केंद्रीय माहिती अधिकार अधिनियमातील कलम २७(३) चा संदर्भ देत राज्य शासनाने तयार केलेले नियम राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवणे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे किंवा नाही याबाबत शासनाने सार्वजनिक स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी देखील करण्यात आली आहे. चंद्रकांत खरात यांनी सादर केलेल्या निवेदनात शासनाकडे खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत : महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २०२६ मधील केंद्रीय कायद्याशी विसंगत असलेल्या सर्व तरतुदी तात्काळ रद्द कराव्यात.नियमांची अंमलबजावणी तात्पुरती स्थगित करण्यात यावी. नियमांची घटनात्मक व कायदेशीर वैधता तपासण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमावी.माहिती अधिकार कार्यकर्ते, विधिज्ञ, पत्रकार, सामाजिक संस्था आणि नागरिकांशी व्यापक चर्चा करून सुधारित नियम तयार करावेत.नागरिकांच्या माहिती मिळविण्याच्या अधिकारावर कोणतेही अनावश्यक निर्बंध लादू नयेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या मूळ उद्देश, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या तत्त्वांचे संरक्षण करण्यात यावे.राज्यातील विविध सामाजिक संघटना आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी देखील या नियमांचा पुनर्विचार करण्याची मागणी केली असून, माहिती अधिकार हा लोकशाही व्यवस्थेचा आत्मा असल्याचे मत व्यक्त केले आहे. नागरिकांना शासनाच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याचा, भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठविण्याचा आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत माहिती मिळविण्याचा अधिकार अबाधित राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. माहिती अधिकार नियम २०२६ संदर्भातील

हा वाद आता केवळ प्रशासकीय किंवा कायदेशीर मुद्दा राहिलेला नसून, तो राज्यातील पारदर्शकता, सुशासन, उत्तरदायित्व आणि नागरिकांच्या लोकशाही अधिकारांच्या संरक्षणाशी निगडित महत्त्वाचा विषय बनला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८